भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०३/२०१७

१) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करून जबर दुखापत केली व मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०९/०३/२०१७ चे ००.२० ते ०१.३० वा. दरम्यान यातील आरोपी क्र.१ व ०२ हे फिर्यादीचे घरासमोर रोडवर फटाके फोडत असतांना फिर्यादी व तिचे पती हे बाहेर फटाके कशाला फोडता असे हटकले आरोपी क्र. ०१ ने फिर्यादी व तिचे पतीला शिवीगाळ करून मारण्यापिटण्याची धमकी दिली व आरोपी क्र. ०२ ने फिर्यादीचे पतीला धक्काबुक्की करित असतांनी त्यात फिर्यादी ही मधात आली असता रोडवर तोंडावर पडल्याने फिर्यादीचा दात पडुन जबर दुखापत झाल्याने फिर्यादी सौ. रेखा योगेश कापसे वय २८ वर्ष रा. शिवनगर तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

२) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे स्कुटीला धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०८/०३/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल चालक हा विरली कडुन मोखे संराडीकडे येत असता आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आपले बाजुने चालवित असलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्कुटीवरून मोखे संराडीकडे ते विरली बुज कडे डब्बलसीट जात असलेल्या स्कुटीला धडक दिल्याने स्कुटी चालक नरेंद्र श्रीराम श्रीपात्रे वय २५ वर्ष व मागे बसलेली कु.वेनु हरिदास काटेखाये वय १७ वर्ष दोन्ही रा. आंबाडी (मासळ) यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने वैदयकीय रिपोर्ट व चौकशी अहवाला व वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७ भादवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

३) शेतीच्या वादावरुन भांडण करून लोखंडी पाईपने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०९/०३/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील आरोपी ने शेतीच्या सौदयावरून फिर्यादीला शिवीगाळ केली असता फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने भांडन करून लोखंडी पाईप (फुंकनी) डोक्यावर व हातावर मारून जखमी केल्याने फिर्यादी राजु गोर्वधन दिघोरे वय ४५ वर्ष रा. कोंढा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) गळफास लावुन युवकाचा मृत्यु :–

दिनांक ०९/०३/२०१७ चे २२.१५ वा. वा. दरम्यान यातील मृतक भुषण भारत बोरकर वय २८ वर्ष, रा. आंबेडकर चौक लाखांदुर याची आई रडत असल्याने फिर्यादी व घराशेजारील लोक मृतकाचे घरी जावुन पाहीले असता मृतक हा घरी स्वयंपाक खोलीचे आडयाला दोरीला फासी लावुन मृतकच्या आईने गळफास लावलेल्या गळयाची दोरी पावसीने कापुन मृतकचे प्रेत खाली पडलेल्या स्थितीत मरण पावल्याचे दिसुन आल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

५) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अळथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०९/०३/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ऑटो रिक्षा क्र. एमएच ३६ एच २५६६ चा चालक याने आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बाभरे पो.स्टे. आंधळगाव यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २८३ भांदवी. मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०९/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, आंधळगाव, अडयाळ व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभटटी दारु + ४२० सडवा साहीत्य किंमती २२,५००/–रु. व जुगारातुन किंमती २७१/–रू. असा एकुण किंमती २२,७७१/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०९/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.